पुढारी शहर-जिल्हा सिंधुदुर्ग, बुधवार, ४ डिसेंबर २०१९

# हळबे महाविद्यालयात एड्स जनजागृती व्याख्यान

दोडामार्ग : वार्ताहर

१ डिसेंबर हा दिवस जागतिक एड्स दिन म्हणून साजरा करण्यात येतो. १ ते ७ डिसेंबर या कालावधीत एड्स सप्ताह निमित्त वेगवेगळ्या संस्थामार्फत एड्स जनजागृती करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सिताराम हळबे महाविद्यालयात एन.एस.एस विभागातर्फे जनजागृतीसाठी दोडामार्ग शासकीय रुग्णालयातील डॉक्टर गोरे यांचे व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



एड्स दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात डॉ. गोरे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना. (छाया : जनार्दन परब)

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस यू दरेकर होते. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. दिलीप बर्वे कार्यक्रम अधिकारी डॉ आर. एस. इंगळे उपस्थित होते. आपल्या व्याख्यानात डॉ. गोरे यांनी एड्सविषयी पि.पि. व्ही. द्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. एड्स सारख्या महाभयंकर रोगाची कारणे, उपाय, त्याविषयी घ्यावयाची काळजी याबाबत अमूल्य विचार मांडले. त्यानंतर प्रा. डॉ. एस यू दरेकर यांनी आपल्या भाषणात एडस् विषयक समाजात कोणकोणते गैरसमज आहेत. त्यात एड्सग्रस्तांकडे समाजाचा बघण्याचा दृष्टिकोन कसा असायला हवा याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला सर्व प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक दिलीप बर्वे यांनी केले. सूत्रसंचालन प्रणाली गवस तर आभार सोनाली पारधी हिने मानले.

Scanned by CamScanner